# हॅलो प्रभात

कोल्हापूर

सोमवार

दि. 27 एप्रिल 2026

RNI NO. MHMAR/25/A4580

कोल्हापूर आवृत्ती

▪ मुंबई ▪ पुणे ▪ सांगली ▪ सातारा ▪ सोलापूर ▪ अहिल्यानगर

▪ वर्ष : ०१ ▪ अंक : ८३ ▪ सोमवार, २७ एप्रिल २०२६ ▪ किंमत : ३ रुपये ▪ पाने : ४




## संक्षिप्त...

### मोफत सौरऊर्जेचे ग्राहकांना आर्थिक चटके

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

राज्यातील वीज वापरकर्त्यांनी स्वखर्चाने उभारलेल्या सोलर रूफटॉपवर कर आकारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यामुळे सौरऊर्जा वापरकर्त्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक चटके सहन करावे लागणार आहेत. राज्यात एकूण 7 लाख 50 हजार सौरऊर्जा वापरकर्ते आहेत. त्यामध्ये घरगुती 4 लाख, कृषी 3 लाख आणि 50 हजार औद्योगिक वापरकर्ते आहेत. वाढते वीज बिल, सौरऊर्जेसाठी मिळणारे शासकीय अनुदान, भारनियमनाचा त्रास यासह पर्यावरणपूरक ऊर्जानिर्मिती आदी कारणांनी या वापरकर्त्यांनी स्वखर्चाने सौरऊर्जा प्रकल्प उभे केले आहेत.

### 'आयडॉल रस्ता' इचलकरंजीत खड्ड्यातच

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक ते निरामय हॉस्पिटलमार्गे सांगली रस्ता हा महत्त्वाचा मार्ग मानला जातो. 'आयडॉल रस्ता' म्हणून विकसित करण्यासाठी सुमारे 12 कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, सिमेंट काँक्रीटचा दर्जेदार रस्ता उभारण्यात येणार आहे. प्रत्यक्षात या रस्त्याच्या कामाला लागलेली संथगती आणि ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त झाले असून अद्याप हा रस्ता खड्ड्यातच आहे.

### चाफळ परिसरात बिबट्याचा धुमाकूळ

**सातारा : हॅलो प्रभात**

चाफळ (ता.पाटण) येथील कुंभार खडी परिसरात शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्याने हल्ला करून एका शेतकऱ्याची शेळी ठार केल्याची घटना घडली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी तातडीने वन विभागाने उपाययोजना करावी, अशी मागणी केली आहे.




# आरोग्य समित्यांचे पुनरुज्जीवन करा

## मंत्री प्रकाश आबिटकर ; दर्जेदार सेवेसाठी निर्देश

**मुंबई : हॅलो प्रभात**



राज्यातील आरोग्य सेवेची गुणवत्ता उंचावण्यासाठी आणि नागरिकांना अधिक प्रभावी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य विभागांतर्गत कार्यरत विविध समित्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत.

रुग्ण कल्याण समिती, जन आरोग्य समिती, महिला आरोग्य समिती आणि ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता समिती या समित्या आरोग्य व्यवस्थेतील महत्त्वाचे घटक असून त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रामीण व शहरी भागात विविध आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी या समित्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रामीण भागात VHNSC तर शहरी भागात MAS या समित्या स्वच्छता, पोषण, पाणीपुरवठा आणि प्राथमिक आरोग्य सेवा यांसाठी कार्यरत आहेत.

तसेच, JAS आणि RKS या समित्या आरोग्य संस्थांमधील सेवांची गुणवत्ता, रुग्णकेंद्रित सुविधा आणि निधीच्या पारदर्शक वापरावर देखरेख ठेवतात. या समित्यांमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, महिला गट, युवा प्रतिनिधी आणि नागरिकांचा सहभाग अपेक्षित आहे. आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सांगितले की, समित्यांच्या माध्यमातून स्थानिक गरजा ओळखून त्यानुसार कृती आराखडे तयार करणे आवश्यक आहे. नियमित बैठका, सदस्यांचे प्रशिक्षण, विभागांतील समन्वय आणि लोकसहभाग यामुळे आरोग्य सेवा अधिक परिणामकारक होईल. या प्रक्रियेत खासदार, आमदार, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य तसेच ग्रामपंचायत प्रतिनिधींनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आवश्यक ते सहकार्य देण्याचे निर्देश देण्यात आले असून, नागरिकांच्या आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## जयसिंगपूर लक्ष्मी रोडवर झाडामुळे रस्ता अरुंद



### अपघाताचा धोका वाढला,चौकशीची मागणी

**जयसिंगपूर : हॅलो प्रभात**

जयसिंगपूर शहरातील लक्ष्मी रोड परिसरात सुवर्ण हॉस्पिटलजवळ, गल्ली क्रमांक १५ ते १७ दरम्यान रस्त्याच्या मधोमध उभे असलेले झाड सध्या वाहतुकीसाठी मोठा अडथळा ठरत आहे. या झाडामुळे संबंधित ठिकाणी रस्त्याची रुंदी तब्बल पाच ते सात फूटांनी कमी झाली असून, अपघाताचा धोका लक्षणीयरीत्या वाढल्याची तक्रार स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

सदर मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणावर वाहनांची ये-जा असते. मात्र रस्ता अरुंद झाल्याने दोन वाहनांना एकाच वेळी मार्गक्रमण करणे कठीण झाले आहे. विशेषतः दुचाकीस्वार व पादचाऱ्यांना याचा सर्वाधिक फटका बसत असून, वाहतुकीदरम्यान गोंधळाचे व धोकादायक प्रसंग वारंवार घडत आहेत. रात्रीच्या वेळी अपुरी प्रकाशव्यवस्था असल्याने अपघाताची शक्यता आणखी वाढत असल्याची भीती व्यक्त होत आहे.

स्थानिकांच्या मते, रस्त्याचे काम करताना योग्य नियोजनाचा अभाव दिसून येतो. झाडाचे स्थलांतर न करता ते तसेच ठेवून रस्ता तयार करण्यात आल्याने हा प्रकार घडल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे या कामामध्ये निष्काळजीपणा झाला का, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

# 'शक्तीपीठ महामार्ग' कोणाच्या हितासाठी?

### आ.जयंत पाटील यांचा सरकारवर सवाल

**सांगली : हॅलो प्रभात**

कोणताही देव आपल्या भक्तांना 'जमिनी द्या आणि माझ्याकडे या' असे सांगत नाही. मग हा निर्णय कोणाच्या हितासाठी घेतला जात आहे?असा सवाल उपस्थित करत जयंत पाटील यांनी शक्तीपीठ महामार्ग प्रकल्पावर तीव्र टीका केली. सांगलीत आयोजित शक्तीपीठ महामार्गविरोधी सभेत ते बोलत होते.

महाराष्ट्रातील एका 'देवा'च्या इच्छेसाठी सामान्य जनतेच्या भावना डावलल्या जात आहेत,असा आरोप करत त्यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "आम्ही सध्या विनंती करत आहोत, मात्र आमची परंपरा क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या विचारांची आहे,असा इशाराही त्यांनी दिला. शक्तीपीठ महामार्गाची लांबी पूर्वी 802 किमी होती, ती आता 856 किमीपर्यंत वाढवण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. लांबी वाढल्याने खर्चही वाढला आहे. भराव टाकून रस्ता उभारण्याच्या योजनेमुळे गुणवत्तेबाबत प्रश्न निर्माण होतात. या प्रकल्पामुळे अनेक गावांची विभागणी होणार असून बाधितांना वाढीव मोबदल्याचे आमिष दाखवले जात आहे,असा आरोप त्यांनी केला. आमच्या वाळवा तालुक्यात सर्व काही सुरळीत असताना हा अनावश्यक रस्ता का लादला जात आहे? विविध देवस्थानांना जोडणारे मार्ग आधीपासून अस्तित्वात असताना नव्या महामार्गाचा अट्टाहास कशासाठी? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. आंदोलन दडपण्यासाठी पोलिस बळाचा वापर करणे चुकीचे असल्याचे सांगत, जमीन ही पूर्वजांची अमूल्य देणगी आहे. आपल्या हक्कांसाठी सर्वांनी एकजुटीने उभे राहण्याची गरज आहे, असे आवाहन त्यांनी केले.

# न्याय बंधुता व समता या त्रिसूत्रीवर काम करणार

### जिल्हाधिकारी डॉ.विजय राठोड

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आखून दिलेल्या न्याय, बंधुता व समता या त्रिसूत्रीवर आपण कामकाज करणार असल्याची ग्वाही नूतन जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी दिली.

निमित्त होते जिल्हाधिकारी कार्यालयातील महाराणी ताराबाई सभागृहात नूतन जिल्हाधिकाऱ्यांचे स्वागत तर मावळत्या जिल्हाधिकाऱ्यांना निरोप समारंभाचे.

मनपा आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड यांच्या हस्ते नूतन जिल्हाधिकारी डॉ. राठोड व मावळते जिल्हाधिकारी श्री येडगे यांना छत्रपती शाहू महाराजांचा पूर्णाकृती पुतळा व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी



अधिकारी डॉ.जॅस्मिन, अति.पोलीस अधिक्षक डॉ.धीरजकुमार, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, महसूल उपजिल्हाधिकारी डॉ. संपत खिलारी, प्रांताधिकारी समीर शिंगटे, प्रांताधिकारी मोसमी बर्डे-चौगुले, प्रांतधिकारी प्रसाद चौगुले आदी उपस्थित होते.

राठोड म्हणाले, कोल्हापूर हे शहर नाही तर ती एक भावना आहे. श्री. अमोल येडगे यांनी कोल्हापुरात लक्षणीय सुधारणा केल्या. त्यांनी सुधारण्याच्या रचलेल्या पायावर, कळस चढवण्यासाठी आपण सर्वजण कटिबद्ध राहू या. यासाठी आपण सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.

तर अमोल येडगे म्हणाले, कोल्हापूर जिल्हा म्हणजे माणुसकीचा जिवंत झरा असलेला जिल्हा होय. कोल्हापूरकर हे सतत नाविन्यतेचा ध्यास घेणारे आहेत. चांगल्या बाबींच्या पाठीशी ते नेहमी खंबीरपणाने उभे राहतात. माझ्या कारकिर्दीत सर्किट बेंच कार्यरत करता आले हा माझ्यासाठी अत्यंत अभिमानास्पद क्षण आहे. कोल्हापूरकरांचे प्रेम सदैव कायम स्मरणात राहील.

नूतन जिल्हाधिकारी श्री. राठोड यांनी २ एप्रिल रोजीच ऑनलाईन कार्यभार स्वीकारला होता. अत्यंत भावस्पर्शी झालेल्या या कार्यक्रमात श्री. येडगे यांना आणखीन थोडा अवधी मिळायला हवा होता अशीच भावना सर्वसामान्य कोल्हापूरकरांची झाली होती.

# एचव्हीएसीआर क्षेत्रात विद्यार्थ्यांसाठी अपार संधी : योगेश गांधी

**वारणानगर : हॅलो प्रभात**



एचव्हीएसीआर (हीटिंग, वेंटिलेशन अँड एअर कंडिशनिंग) क्षेत्र हे विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध करून देणारे असून विविध अभियांत्रिकी शाखांतील विद्यार्थ्यांनी या क्षेत्राचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन योगेश गांधी यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात फॅकल्टी ॲडव्हायझर प्रा. आतिश चव्हाण यांनी मान्यवरांच्या स्वागताने केली. यावेळी योगेश गांधी यांनी एचव्हीएसीआर तंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट करत घर, कार्यालये तसेच वाहनांमधील तापमान, आर्द्रता आणि हवेची गुणवत्ता नियंत्रित करण्यामध्ये या प्रणालीची भूमिका अधोरेखित केली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अवेसअहमद हुसेनी (अध्यक्ष, कोल्हापूर इशरे चॅप्टर), योगेश गांधी (प्रेसिडेंट-इलेक्ट) आणि खजिनदार विजय पाटील उपस्थित हो वंदना पुसाळकर यांची विशेष उपस्थिती लाभली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एन. माने, अधिष्ठाता डॉ. एस. एम. पिसे, यांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. पी. व्ही. मुळीक तसेच प्रा. जी. एस. कांबळे उपस्थित होते. तसेच वारणा विविध उद्योग व शिक्षण समूहाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनयरावजी कोरे, कुलाधिकारी एन. एच. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. व्ही. व्ही. कारजीनी यांनी मार्गदर्शन केले.डॉ. हुसेनी यांनी पदाधिकाऱ्यांना शपथ देऊन विद्यार्थी शाखेच्या पुनर्स्थापनेची घोषणा केली. त्यानंतर डॉ. वंदना पुसाळकर यांनी "ब्लू-ग्रीन सिनर्जी" या विषयावर व्याख्यान देत पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाची माहिती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थी अध्यक्षा सलोनी पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

# ऊर्जा परिवर्तनातून राज्याच्या विकासाला बळ ; महावितरणचा सन्मान

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासात ऊर्जा परिवर्तनाद्वारे दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल महावितरणचा दोन प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मान करण्यात आला आहे.

'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेसाठी 'रिन्यूएबल एनर्जी इनिशिएटिव्ह ऑफ द इयर' तर अपारंपरिक ऊर्जेच्या वाढत्या वापरासाठी 'क्लीन एनर्जी अँड रिन्यूएबल अडॉप्शन अवॉर्ड' प्रदान करण्यात आला. मुंबईत आयोजित महाराष्ट्र बिझनेस परिषदेत हे पुरस्कार महावितरणच्या अधिकाऱ्यांनी स्वीकारले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली ऊर्जा क्षेत्रात मोठे परिवर्तन घडत असून २०३० पर्यंत ३९,५०० मेगावॅट हरित ऊर्जा क्षमतेची भर पडणार आहे. त्यामुळे राज्यातील नवीकरणीय ऊर्जेचे प्रमाण १३ टक्क्यांवरून ५२ टक्क्यांपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे.

महावितरणने आतापर्यंत ४७,३४७ मेगावॅट वीज खरेदीचे दीर्घकालीन करार केले असून त्यात ६५ टक्के हिस्सा अपारंपरिक ऊर्जेचा आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा स्वस्त वीज उपलब्ध होत आहे, तसेच वीज खरेदी खर्चात मोठी बचत होत आहे. दरम्यान, 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेअंतर्गत राज्यात ९.१७ लाख सौर पंप कार्यान्वित झाले असून देशात अव्वल स्थान मिळाले आहे. या योजनेमुळे ४२ लाख एकर क्षेत्राला दिवसा मोफत वीजपुरवठा होत आहे.

# शेतीच्या आव्हानांवर मात करण्यासाठी संस्थांचे एकत्रित प्रयत्न गरजेचे : बसवराज मास्तोळी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**




शेतीसमोरील वाढत्या आणि बदलत्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कृषी विभाग, विद्यापीठे आणि संबंधित सर्व संस्थांनी एकत्रितपणे काम करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन विभागीय कृषी सहसंचालक बसवराज मास्तोळी यांनी केले. महाराष्ट्र शासन कृषी विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि 'आत्मा' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी" या एकदिवसीय खरीप हंगामपूर्व कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालिंदर पांगारे यांनी स्वागत करत खरीप हंगामाच्या पूर्वतयारीसह विविध शासकीय योजनांची माहिती दिली. मास्तोळी यांनी कृषी विभाग, विद्यापीठ, 'आत्मा' व 'उमेद' यांसारख्या संस्थांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी अशा उपक्रमांचे आयोजन सातत्याने करावे, असे आवाहन केले.

#### कार्यशाळेत भरड धान्यांचा चमत्कार

स्थानिक धान्ये आणि आधुनिक आश्चर्य' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी डॉ. इराण्णा उडचान यांनी पुस्तकाच्या संकल्पनेविषयी माहिती दिली. प्रमुख अतिथी दिनेशजी कुलकर्णी यांनी कृषी क्षेत्राचे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील महत्त्व अधोरेखित करत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

तांत्रिक सत्रांमध्ये तज्ज्ञांनी ऊस, भात, सोयाबीन, भाजीपाला व मसाला पिकांचे तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती, मित्र कीटक, अन्नप्रक्रिया उद्योग व विविध शासकीय योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेस कृषी अधिकारी, शास्त्रज्ञ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने झाला.

# संपूर्ण राज्याचा कोपरा अन कोपरा फिरा

## ना.नितेश राणे ; भाजपसाठी युवकांचं संघटन मजबुत करा

**सिंधुदुर्ग : हॅलो प्रभात**

राज्यातील युवा वर्ग भाजपशी जोडला जावा आणि पक्षाची ध्येय, धोरणं समाजाच्या तळागाळापर्यंत पोचावीत, यासाठी भारतीय जनता युवा मोर्चाच्यावतीने युवाशक्ती जागर यात्रा सुरू करण्यात आली आहे. मुंबईपासून सुरू झालेली ही यात्रा राज्याच्या कानाकोर्पयात फिरणार आहे. प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या नेतृत्वाखाली ही यात्रा सिंधुदुर्ग जिल्हयात पोचली. यावेळी कार्यकर्त्यांनी या यात्रेचे जल्लोषी स्वागत केले. या दरम्यान महाडिक यांनी कणकवली मध्ये मंत्री नितेश राणे यांची भेट घेतली. युवा जागर यात्रेच्या उपक्रमाचे



नामदार नितेश राणे यांनी कौतुक केले. युवाशक्ती जागर यात्रेचा हेतू आणि राज्यभर मिळणारा प्रतिसाद, याबाबत कृष्णराज महाडिक यांनी, नामदार नितेश राणे यांना सविस्तर माहिती दिली. त्यावर संपूर्ण राज्याचा कानाकोपरा या यात्रेद्वारे पिंजुन काढा आणि समाजातील सर्वच घटकांना विशेषत: युवा वर्गाला भाजपच्या विचारधारेत आणण्यासाठी जोमाने प्रयत्न करा, असा सल्ला नामदार नितेश राणे यांनी दिला. या दरम्यान युवाशक्ती आणि भाजपच्या पदाधिकार्यांचा मेळावाही पार पडला. त्यामध्ये प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी, भाजपच्या ध्येयधोरणांबाबत तसंच केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजना युवा वर्गासह समाजाच्या तळागाळापर्यंत पोचवण्यासाठी सर्वच पदाधिकार्यांनी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. जिल्हयातील संघटनात्मक बळकटीकरण आणि युवा मोर्चाच्या आगामी उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, जिल्हा सरचिटणीस संदीप साठम, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रमोद कामत, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संदीप मेस्त्री, जिल्हा परिषद सदस्य मनोज रावराणे, युवामोर्चा प्रदेश उपाध्यक्ष लखम राजेभोसले, सभापती प्रितेश राऊळ, मिलींद मेस्त्री, अशोक सामंत, श्वेता कोरगांवकर, दिलीप तळेकर यांच्यासह भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.


## संपादकीय

# नवोन्मेषाच्या वाटेवर भारतीय औषधनिर्माण क्षेत्राचा झपाट्याने प्रवास



भारताचा औषधनिर्माण उद्योग दीर्घकाळापासून 'जगाचे औषधालय' म्हणून ओळखला जातो. स्वस्त आणि दर्जेदार जेनेरिक औषधांच्या उत्पादनात जागतिक नेतृत्व मिळवलेल्या भारताने आता पुढील टप्प्याकडे निर्णायक पाऊल टाकले आहे. येत्या दशकात केवळ जेनेरिक औषधांपुरते मर्यादित न राहता नावीन्यपूर्ण औषधे, जैविक उत्पादने, फर्मेंटेशन-आधारित निर्मिती आणि अत्याधुनिक उपचारपद्धतींमध्येही भारत एक महत्त्वाची जागतिक शक्ती म्हणून उदयास येण्याच्या मार्गावर आहे. हा बदल केवळ उद्योगाच्या वाढीचा नाही, तर देशाच्या आरोग्यव्यवस्थेतील आणि वैज्ञानिक क्षमतेतील आमूलाग्र परिवर्तनाचा संकेत आहे. जागतिक औषधनिर्माण क्षेत्रात आज जैविक औषधे, बायोसिमिलर्स आणि विशेष औषधांचा वाटा ४० टक्क्यांहून अधिक झाला आहे. त्यामुळे पारंपरिक जेनेरिक उत्पादनांपासून नवोन्मेषाकडे वळणे ही काळाची गरज ठरली आहे. भारताने ही गरज ओळखून संशोधन आणि विकासावर भर देण्यास सुरुवात केली आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात जाहीर झालेला १० हजार कोटी रुपयांचा 'बायोफार्मा शक्ती' उपक्रम हा या परिवर्तनाचा कणा ठरणार आहे. यामुळे पुढील ८ ते १० वर्षांत भारत जैवऔषधनिर्मिती आणि नव्या उपचारपद्धतींचे प्रमुख जागतिक केंद्र म्हणून उभा राहण्याची शक्यता अधिक दृढ झाली आहे. या उपक्रमाचा गाभा म्हणजे संशोधनाला चालना, उद्योग-शैक्षणिक सहकार्याची मजबुती आणि नवोन्मेषाधारित परिसंस्थेची उभारणी. 'फार्मा मेडटेक संशोधन व नवोपक्रम', 'बायोनेस्ट' यांसारख्या योजनांच्या माध्यमातून नव्या कल्पनांना प्रत्यक्ष उत्पादनात रूपांतरित करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. यामुळे भारतातील तरुण संशोधक, स्टार्टअप्स आणि उद्योग यांना नवे दालन खुले झाले आहे. फर्मेंटेशन-आधारित उत्पादन हा या धोरणाचा आणखी एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. अँटीबायोटिक्स, लसी, एन्झाइम्स यांसारख्या अत्यावश्यक जैवउत्पादनांमध्ये भारत दीर्घकाळ आयातीवर अवलंबून राहिला आहे. मात्र आता पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि प्रोत्साहन धोरणांमुळे देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढवण्यावर भर दिला जात आहे. यामुळे केवळ आत्मनिर्भरता वाढणार नाही, तर जागतिक बाजारपेठेत भारताची स्पर्धात्मकताही मजबूत होईल. याचबरोबर वैद्यकीय संशोधन क्षेत्रातील विस्तारही तितकाच निर्णायक आहे. देशभरात उभारण्यात येणाऱ्या सुमारे एक हजार मान्यताप्राप्त क्लिनिकल ट्रायल केंद्रांमुळे भारत औषध विकासाच्या जागतिक नकाशावर अधिक ठळकपणे दिसू लागेल. कमी खर्च, कुशल मनुष्यबळ आणि सुधारित नियामक प्रक्रिया यामुळे भारत उच्च दर्जाच्या क्लिनिकल संशोधनासाठी आकर्षणकेंद्र ठरत आहे. नियामक सुसूत्रीकरण आणि डिजिटल मंजुरी प्रक्रियांमुळे उद्योगांना सुलभता मिळत असून जागतिक विश्वासही वाढत आहे. गेल्या काही वर्षांत उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन योजना आणि बल्क ड्रग पार्कच्या माध्यमातून सक्रिय औषध घटकांचे देशांतर्गत उत्पादन वाढले आहे. परिणामी औषधांच्या किंमती नियंत्रणात राहिल्या असून नागरिकांना स्वस्त दरात उपचार मिळू लागले आहेत. प्रधानमंत्री जनऔषधी योजनेच्या माध्यम ातून देशभरात हजारो केंद्रांमधून किफायतशीर औषधे उपलब्ध होत आहेत. कर्करोग आणि दुर्मिळ आजारांवरील औषधांसाठी सीमाशुल्क सवलतींसारख्या उपाययोजनांमुळे उपचार अधिक सुलभ होत आहेत. तथापि, या सर्व सकारात्मक घडामोडींमध्ये एक महत्त्वाचे आव्हान अजूनही उभे आहे. संशोधनासाठी सातत्यपूर्ण आणि मोठ्या प्रमाणात गुंतवणूक. नवोन्मेष हा दीर्घकालीन आणि खर्चिक प्रवास असल्याने सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील सहकार्य अधिक मजबूत करणे अपरिहार्य आहे. गुणवत्तेची उच्च मानके राखत जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी दीर्घकालीन धोरणात्मक बांधिलकी आवश्यक आहे. भारताची औषधनिर्माण बाजारपेठ आज चार लाख कोटी रुपयांहून अधिक मूल्याची आहे आणि ती वेगाने विस्तारत आहे. अशा पार्श्वभूमीवर, नवोन्मेष, तांत्रिक प्रगती आणि धोरणात्मक पाठबळ यांच्या जोरावर भारत उच्च मूल्याच्या औषधनिर्मितीकडे झेपावत आहे. हा प्रवास केवळ आर्थिक वृद्धीपुरता मर्यादित नसून देशाच्या आरोग्यसुरक्षेला आणि जागतिक आरोग्यव्यवस्थेत भारताच्या भूमिकेला अधिक बळकट करणारा आहे. एकूणच, भारताचा औषधनिर्माण उद्योग नव्या पर्वात प्रवेश करत आहे जिथे प्रमाणाबरोबरच गुणवत्ता, नवोन्मेष आणि जागतिक नेतृत्व यांना समान महत्त्व आहे. 'विकसित भारत २०४७'च्या ध्येयाकडे वाटचाल करताना हे क्षेत्र देशाच्या प्रगतीचा प्रमुख आधारस्तंभ ठरणार आहे, यात शंका नाही.

# प्रसिद्ध हँडसम अभिनेते : विनोद खन्ना



## २७ एप्रिल : पुण्यतिथी

**हॅलो प्रभात**

**विनोद खन्ना हे हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते. त्यांचा जन्म ६ ऑक्टोबर १९४६ ला पेशावर (पाकिस्तान) येथे झाला. भारताची फाळणी झाल्यानंतर त्यांचे कुटुंब मुंबईमध्ये आले. त्यांच्या वडिलांचे नाव किसनचंद खन्ना आणि आईचे नाव कमल होते.**

विनोद खन्ना यांच्या वडिलांचा कपडे आणि रसायनांचा व्यापार होता. विनोद खन्ना यांचे सुरुवातीचे शिक्षण मुंबईतील सेंटमेरी स्कूलमध्ये झाले. १९६० नंतर पुढील शिक्षण नाशिकमधील बर्नेस स्कूल या निवासी शाळेमध्ये झाले. मुंबईतील सिडनहम कॉलेजमधून त्यांनी पदवी घेतली. त्यांना हिंदी, मराठी, इंग्लिश, पंजाबी या भाषा चांगल्या बोलता येत होत्या. शालेय वयात अभिनयाशी संबंधित केलेल्या कार्यक्रमांमुळे त्यांना पुढे अभिनयाची आवड निर्माण झाली; पण याच क्षेत्रात काम करण्यासाठी त्यांच्या घरून त्यांना विरोध होता.

प्रसिद्ध अभिनेते सुनील दत्त यांच्या मन का मीत (१९६८) या चित्रपटामधून विनोद खन्ना यांना पहिल्यांदा संधी मिळाली. यात त्यांनी खलनायकाची भूमिका साकारली. त्यांच्या सुरुवातीच्या पूरब और पश्चिम, सच्चा झुठा, आन मिलो सजना, मस्ताना, ऐलान इत्यादी चित्रपटांमधून त्यांनी खलनायकाच्या भूमिका साकारल्या. हम तुम और वो (१९७१) हा नायक म्हणून त्यांचा पहिला चित्रपट होता. त्यानंतर गुलजार यांची कथा, पटकथा आणि दिग्दर्शन असलेला मेरे अपने (१९७१) हा बंगाली आपनजन याचा हिंदीमध्ये रूपांतर केलेला चित्रपट विनोद खन्नांसाठी महत्त्वाचा ठरला. यामध्ये त्यांनी श्याम या दमदार तरुणाची भूमिका केली होती. हा चित्रपट गाजला.

पुढे गुलजार यांच्या अचानक (१९७३) या चित्रपटात त्यांनी रणजित खन्ना या प्रामाणिक सैनिकी अधिकाऱ्याची केलेली करारी भूमिका लक्षणीय ठरली. याच टप्प्यावर ते खलनायकाच्या भूमिकेकडून नायकाच्या भूमिकेकडे वळले. नायक अथवा सहनायक अशा भूमिका साकारत त्यांनी आपली यशस्वी वाटचाल कायम ठेवली. फरेबी, हत्यारा, आप की खातिर, राजमहल, द बर्निंग ट्रेन, इम्तिहान, खूनपसीना, मेमसाब, प्रेम कहानी, इन्कार, कुर्बान, दयावान, हेराफेरी, अमर अकबर अँथनी, हाथ की सफाई, इन्सान, नेहले पे देहला, रेश्मा और शेरा, सरकारी मेहमान, दौलत, लेकिन, मीरा, हमशकल, शंकर शंभू, आरोप, परिचय, एक हसीना दो दिवाने अशा अनेक चित्रपटांमधून त्यांनी त्यांच्या अभिनयाचा ठसा उमटवला. प्रकाश मेहरा दिग्दर्शित हाथ की सफाई (१९७५) या चित्रपटामध्ये रणधीर कपूर यांच्यासोबत विनोद खन्ना सहनायक होते. एकीकडे मोठा तस्कर तर दुसरीकडे प्रेमळ नवरा अशी भूमिका या चित्रपटात त्यांनी निभावली. प्रकाश मेहरा दिग्दर्शित मुकद्दर का सिकंदर (१९७८) या चित्रपटामध्ये अमिताभ बच्चन यांच्या मित्राची - विशाल आनंद या वकीलाची - भूमिका विनोद खन्ना यांनी केली. त्यांच्या कारकीर्दीतील हा एक लोकप्रिय चित्रपट आहे. राखी, विनोद खन्ना आणि अमिताभ बच्चन यांच्या प्रेमाचा त्रिकोण या चित्रपटामध्ये पाहायला मिळतो. दोघांची पडद्यावरील मैत्री प्रेक्षकांना भावली. या चित्रपटामधील विशाल या पात्रासाठी विनोद खन्ना यांना फिल्मफेअरचे सर्वश्रेष्ठ सहायक अभिनेत्याचे नामांकन मिळाले. अतिशय डौलदार चाल, भेदक नजर आणि आत्मविश्वासपूर्ण देहबोली हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष होते. लता मंगेशकर निर्मित आणि गुलजार दिग्दर्शित लेकिन हा विनोद खन्नांच्या कारकिर्दीतील एक उल्लेखनीय चित्रपट आहे. १९७१ मध्ये विनोद खन्ना यांनी अभिनय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या गीतांजली यांच्यासोबत लग्न केले. त्यांना अक्षय खन्ना आणि राहुल खन्ना अशी दोन मुले आहेत. विनोद खन्ना यांनी आपल्या कारकिर्दीच्या शिखरावर असताना चित्रपटसृष्टीतून अचानक निवृत्ती घेतली (१९८२) व आचार्य रजनीश यांचे शिष्यत्व स्वीकारले. विनोद खन्ना पाच वर्षे अमेरिकेत ओशो रजनीश यांच्या आश्रमात राहत होते.

१९८५ मध्ये ते पुन्हा मुंबईत आल्यानंतर गीतांजली आणि त्यांचा घटस्फोट झाला. १९९० मध्ये त्यांनी कविता दफ्तरी यांच्यासोबत दुसरे लग्न केले. विनोद आणि कविता खन्ना यांना साक्षी आणि श्रद्धा खन्ना ही दोन मुले आहेत.

१९८७ मध्ये विनोद खन्ना यांनी चित्रपटसृष्टीत 'इन्साफ' या चित्रपटामधून पुनरागमन केले. त्यानंतर त्यांनी सत्यमेव जयते, महासंग्राम, क्षत्रिय, कारनामा, रिहाई, बटवारा, चांदनी इत्यादी चित्रपटांत भूमिका साकारल्या. १९९७ साली त्यांनी हिमालयपुत्र या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटातून त्यांचा मुलगा अक्षय खन्ना याने नायकाची भूमिका केली होती. नंतरच्या काळात त्यांनी वाँटेड, दबंग, रेड अलर्ट द वॉर विदिन इत्यादी चित्रपटांत चरित्रभूमिका साकारल्या. रोहित शेट्टी दिग्दर्शित दिलवाले हा त्यांचा प्रदर्शित झालेला शेवटचा चित्रपट.

विनोद खन्ना यांनी चित्रपटात काम करण्या-बरोबरच राजकारणातही सक्रिय सहभाग घेतला आणि ते यशस्वीही ठरले. १९९७ साली त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आणि ते पंजाबमधील गुरुदासपूर मतदारसंघातून तीनवेळा खासदार म्हणून निवडून आले. ते पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री होते. पुढे परराष्ट्र व्यवहार खात्यातही कार्यरत होते. विनोद खन्ना यांना अनेक पुरस्कार मिळाले. हाथ की सफाई या चित्रपटासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट साहाय्यक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार देण्यात आला. २००० मध्ये विनोद खन्ना यांना चित्रपटसृष्टीतील विशेष योगदानाबद्दल फिल्मफेअर जीवनगौरव पुरस्काराने गौरवण्यात आले. विनोद खन्ना यांना त्यांच्या मृत्युनंतर चित्रपट कारकीर्दीसाठी दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### बॉलिवूडच्या 'दयावान'चा अलविदा

विनोद खन्ना यांच्यावर मुंबईतील गिरगावच्या सर एचएन रिलायन्स फाऊंडेशन अँड रिचर्स सेंटरमध्ये उपचार सुरु होते. त्यानंतर त्यांना डिस्चार्जही मिळाला होता. मात्र प्रकृतीत पूर्णपणे सुधारणा झाली नसल्याने, ते देखरेखीखाली होते. अखेर २७ एप्रिल २०१७ रोजी वयाच्या ७० व्या वर्षी मुंबईमध्ये कर्करोगाने त्यांचे निधन झाले.



### विनोद खन्ना यांची कारकीर्द

- सध्या पाकिस्तानमध्ये असलेल्या पेशावरमध्ये उद्योगपतीच्या घरात ६ ऑक्टोबर १९४६ रोजी जन्म. तीन बहिणी आणि एक भाऊ असा परिवार. विनोद खन्ना यांच्या जन्मानंतर काही दिवसातच भारताचे विभाजन झाले. त्यानंतर त्यांचे कुटुंब पेशावर सोडून मुंबईत स्थायिक झाले.
- मुंबईतील सेंट मॅरी स्कूलमध्ये प्राथमिक व सेंट झेव्हिअर्स हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण.
- १९५७ साली कुटुंबाचे दिल्लीला स्थलांतर, त्यानंतर दिल्ली पब्लिक स्कूलमध्ये शिक्षण.
- कुटुंबाचं १९६० साली पुन्हा मुंबईला स्थलांतर. त्यानंतर विनोद खन्ना यांना शिक्षणासाठी नाशिकमधील देवळालीच्या बार्न्स स्कूलमध्ये पाठवण्यात आलं. शिक्षण चालू असताना 'सोलवा साल', मुघल-ए-आझम हे सिनेमा पाहून ते बॉलिवूडकडे आकर्षित झाले.
- मुंबईतील सिडनहॅम महाविद्यालयातून कॉमर्स शाखेतून ग्रॅज्युएशन.
- १९६८ ला 'मन का मीत' सिनेमातून बॉलिवडू पदार्पण, पहिल्यांदाच खलनायकाची भूमिका.
- १९६८ ते २०१३ या काळात १४१ चित्रपटांमध्ये त्यांनी काम केले.
- खलनायक म्हणून पदार्पण करत अभिनेता म्हणून पुढे येणाऱ्या अभिनेत्यांपैकी एक.
- मेरे अपने, मेरा गाव मेरा देश, गद्दार, जेल यात्रा, कच्चे धागे, अमर अकबर अँथोनी, राजपूत, कुर्बानी, दयावान, कारनामा हे गाजलेले सिनेमे.
- १९८२ साली पाच वर्षांसाठी बॉलिवूडमधून संन्यास
- १९८७ साली 'इन्साफ' सिनेमातून पदार्पण. त्यानंतर जूर्म, चांदणी यासारख्या हिट सिनेमात काम

### विनोद खन्ना यांना मिळालेले पुरस्कार

- हाथ की सफाई सिनेमासाठी १९७५ साली सर्वोत्कृष्ट सहकलाकार म्हणून फिल्मफेअर पुरस्कार.
- १९७७ साली हेरा फेरी सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट सहकलाकार म्हणून नामांकन.
- १९७९ साली मुकद्दर का सिकंदर सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट सहकलाकार म्हणून नामांकन.
- १९८१ साली कुर्बानी सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून गौरव.
- १९९९ जीवनगौरव पुरस्कार. • २००१ कलाकार जीवनगौरव पुरस्कार.
- २००५ स्टारडस्ट रोल मॉडेल ऑफ द ईयर पुरस्कार. • २००७ झी सिने जीवनगौरव पुरस्कार.

## 'पुष्पा इम्पॉसिबल'मध्ये मुस्कानचा ॲक्शन सीन

**मुंबई : हॅलो प्रभात**

सोनी सबवरील 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेत आगामी भागात थरारक वळण पाहायला मिळणार आहे. शनाया (मुस्कान बामने) चिरागला गुंडांच्या तावडीतून वाचवताना स्वतः गंभीर जखमी होणार असल्याचा प्रसंग दाखवण्यात येणार आहे.या ॲक्शन सिक्वेन्समुळे कथानकात नाट्यमय रंगत वाढणार असून शनायाचे धाडस आणि तिची उपस्थिती ठळकपणे समोर येणार आहे. हा सीन साकारताना अभिनेत्री मुस्कान बामनेला शारीरिक व भावनिक आव्हानांचा सामना करावा लागल्याचे समोर आले आहे.

आत्मसंरक्षण ही महत्त्वाची जीवनकौशल्य असल्याचे सांगत, अशा प्रसंगांमुळे आत्मविश्वास वाढतो, असे मुस्कानने नमूद केले. या घटनेनंतर मालिकेच्या कथानकात आणखी भावनिक व थरारक घडामोडी घडणार आहेत.

## 'हस्तिनापुर के वीर'मध्ये चंदन आनंदचा प्रभावी शकुनी

**मुंबई : हॅलो प्रभात**



सोनी सबवरील आगामी 'हस्तिनापुर के वीर' या मालिकेत अभिनेता चंदन आनंद शकुनीची भूमिका साकारताना दिसणार आहे. महाभारताच्या पांडव-कौरवांच्या बालपणावर आधारित या मालिकेत नाती, निष्ठा आणि नियतीच्या घडामोडींचा वेध घेतला जाणार आहे.

चंदन आनंदने साकारलेला शकुनी बुद्धिमान, निरीक्षक आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून दाखवण्यात आला आहे. सूक्ष्मपणे परिस्थितीवर नियंत्रण ठेवत घटनांना दिशा देणारे हे पात्र कथानकात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. ही नवी मालिका लवकरच सोनी सबवर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## पोकोकडून पोको सी ८१ सिरीज लाँच

**नाशिक : हॅलो प्रभात**




पोकोने पोको सी८१ सिरीजच्या लाँचची घोषणा केली. या सिरीजमध्ये पोको सी८१ आणि पोको सी८१एक्स या दोन मॉडेल्सचा समावेश आहे. विश्वासार्ह परफॉर्मन्स, मोठा आकर्षक डिस्प्ले आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी प्रदान करण्यासाठी डिझाइन केलेली ही नवीन सिरीज दैनंदिन वापरकर्त्यांच्या गरजा पूर्ण करते. पोको सी८१एक्स (३ जीबी + ६४ जीबी) ची किंमत ९,९९९ रुपये ठेवण्यात आली आहे, तर पोको सी८१ (४ जीबी + ६४ जीबी) १०,९९९ रुपयांना उपलब्ध आहे. पोको सी८१ सिरीज भारतात उपलब्ध असून, तिची विक्री २७ एप्रिल २०२६ पासून सुरू होणार आहे.

## टाकवे धरणाच्या गेट दुरुस्तीला सुरुवात : रणधीर नाईक

**शिराळा : हॅलो प्रभात**

टाकवे येथील धरणाच्या गेटचे दुरुस्तीचे काम गतवर्षीपासून अपूर्ण असल्यामुळे लाभ क्षेत्रामधील गावांना पाणी पुरेशे मिळत नव्हते.सोमवारपासून टाकवे धरणातील गेट दुरुस्तीचे काम सुरू होणार असून लाभ क्षेत्रामधील शेतकऱ्यांनी एकमताने संमती दिली असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रणधीर नाईक यांना दिली.



**टाकवे येथे झालेल्या बैठकीमध्ये रणधीर नाईक, प्रसाद गायकवाड, तनवीर मुल्ला, वैभव कुलकर्णी व शेतकरी**

टाकवे येथे धरणाच्या गेटच्या दुरुस्तीच्या कामाचे नियोजनासाठी परिसरातील शेतकरी व अधिकारी यांच्या झालेल्या बैठकीमध्ये नाईक बोलत होते. बैठकीला डेपोटी इंजिनिअर प्रसाद गायकवाड,पाटबंधारे शाखा अभियंता तनवीर मुल्ला, ठेकेदार वैभव कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## शाओमीकडून रेडमी ए७ आणि रेडमी ए७ प्रो लाँच

**पुणे : हॅलो प्रभात**

शाओमी इंडियाने भारतात रेडमी ए७ सिरीजच्या लाँचची घोषणा केली आहे. विश्वासार्हता, आकर्षक डिस्प्ले आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या बॅटरी परफॉर्मन्सवर लक्ष केंद्रित करून कंपनीने आपल्या परवडणाऱ्या स्मार्टफोन पोर्टफोलिओचा विस्तार केला आहे.




रेडमी ए७ मध्ये ६.८८-इंचाचा मोठा डिस्प्ले देण्यात आला आहे, तर रेडमी ए७ प्रो मध्ये ६.९-इंचाचा कऊ+ डिस्प्ले असून तो १२०कू पर्यंतच्या रिफ्रेश रेटला सपोर्ट करतो. या डिस्प्लेला डोळ्यांच्या संरक्षणासाठी ट्रिपल टीयूव्ही ऱ्हेनलँड सर्टिफिकेशन मिळाले आहे.

रेडमी ए७ आणि रेडमी ए७ प्रो ची अनुक्रमे किंमत रु.१०,४९९ आणि रु. ११,४९९ असणार आहे. रेडमी ए७ सिरीज शाओमी रिटेल आऊटलेट्समध्ये उपलब्ध आहे, तसेच विक्रीला २४ एप्रिलपासून सुरूवात होईल.

## 'व्हॅनेसा'चा डर्मा-केअर क्षेत्रात प्रवेश

**मुंबई : हॅलो प्रभात**




'प्रो+ अंडरआर्म रोल-ऑन्स' लाँच

महिलांचे प्रीमियम सुवासिक आणि शरीर निगा उत्पादन ब्रँड असलेल्या 'व्हॅनेसा'ने, 'व्हॅनेसा प्रो+' या नवीन श्रेणीच्या लाँचसह डर्मा-केअर क्षेत्रात पदार्पण केले आहे. या श्रेणीतील 'अंडरआर्म रोल-ऑन' विभागाचा चेहरा म्हणून करिना कपूर खान या ब्रँडचे नेतृत्व करत आहेत. हा विस्तार व्हॅनेसाच्या उत्क्रांतीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा असून, वैयक्तिक निगा विभागातील आपले स्थान अधिक बळकट करत कंपनी आता घटकांवर आधारित आणि त्वचेवर लक्ष केंद्रित करणाऱ्या क्षेत्राकडे वळली आहे. या लाँचला ब्रँड ॲम्बेसेडर करिना कपूर खान यांचा समावेश असलेल्या एका मोहिमेचा पाठिंबा लाभला आहे. हा चित्रपट अंडरआर्मच्या निगेकडे आत्मविश्वासाने पाहण्याचा दृष्टिकोन मांडतो.

## रिलायन्सच्या भागीदारीत 'टाइम १०० नेक्स्ट' प्रथमच भारतात

**मुंबई : हॅलो प्रभात**



TIME ने आपल्या 'टाइम १०० नेक्स्ट' या प्रतिष्ठित उपक्रमाचे नवीन भारतीय संस्करण 'टाइम १०० नेक्स्ट इंडिया ' सुरू करण्याची घोषणा केली आहे. रिलायन्सच्या भागीदारीत सुरू होणाऱ्या या उपक्रमाद्वारे भारतातील पुढील पिढीतील नेत्यांचा गौरव केला जाईल, जे आपल्या कार्य आणि दृष्टीकोनातून देशाच्या भविष्यास आकार देत आहेत. ही घोषणा न्यूयॉर्क शहरात आयोजित वार्षिक ढखचए१०० गाला कार्यक्रमादरम्यान टाइम चे मुख्य कार्यकारी अधिकारी जेसिका सिब्ली आणि रिलायन्स फाउंडेशनच्या संस्थापक व अध्यक्षा नीता मुकेश अंबानी यांनी संयुक्तपणे केली.

## 'बीएमडब्ल्यू एफ ४५० जीएस' लॉन्च

**मुंबई : हॅलो प्रभात**



बीएमडब्ल्यू मोटोराड इंडियाने भारतीय बाजारपेठेत नवीन 'बीएमडब्ल्यू एफ ४५० जीएस' अधिकृतपणे लाँच केली आहे. बहुप्रतिक्षित असलेली ही मोटारसायकल बीएमडब्ल्यू मोटोराड इंडियाच्या सर्व डीलर नेटवर्कवर बुकिंगसाठी उपलब्ध असून, जून २०२६ पासून तिचे वितरण सुरू होईल. बीएमडब्ल्यू एफ ४५० जीएसची रचना जर्मनीमध्ये बीएमडब्ल्यू मोटोराडद्वारे करण्यात आली असून तिचे उत्पादन भारतात स्थानिक पातळीवर केले जाईल. 'जीएस' म्हणजे रस्ता असो वा खडतर मार्ग, सर्व ठिकाणी साथ देणारा एक 'सर्वोत्तम सोबती'. बीएमडब्ल्यू एफ ४५० जीएस खऱ्या अर्थाने जीएसचा मूळ गाभा प्रतिबिंबित करते - मोटारसायकलवर स्वार व्हा, थ्रॉटल फिरवा आणि पूर्ण नियंत्रण व जास्तीत जास्त आत्मविश्वासासह प्रवासाचा आनंद घ्या.

हॅलो प्रभात
नवे विचार...नवी सुरुवात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात, कार्यालय : एस.९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२(महाराष्ट्र)** येथून प्रसिद्ध केले.

■ The imprint line should be printed legibly as Printed by Published by GANESH BANDA PATIL on behalf of GANESH BANDA PATIL, printed at and published at 946, GF-7, Gulmarg Appartment, Sarnaik Colony, Shivaji Peth, **kolhapur** **- Editor GANESH BANDA PATIL.**

■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३० ■ **सांगली कार्यालय :** कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली.४१६४१६

■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादिका : माहेश्वरी घोरपडे ■ संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपर्क : 9011889001